# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
## शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला उस्मानपुरा
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org email: roaurangabad@dtemaharashtra.gov.on


जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१९/ 2409

**परिपत्रक** दिनांक 29 JUL 2019

**विषय :- सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अनुज्ञेयतेबाबत गट-क व गट-ड पदावर कार्यरत कर्मचा-यांची माहिती.**

**संदर्भ :- शासन निर्णय, वित्त विभाग निर्णय क्रमांक वेतन १११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३,दि.०२/०३/२०१९.**

वरील संदर्भिय विषयाला अनुसरुन या विभागाच्या सर्व संस्था प्रमुखांना सुचित करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयानुसार सातव्या वेतन आयोगाच्या कार्याकाळामध्ये १०,२०,३० वर्षाच्या नियमित सेवे नंतर तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दिनांक ०१.०१.२०१६ पासून अंमलात आलेली आहे.

पुर्वीच्या अनुज्ञेय योजनेनुसार १२/२४ वर्षानंतर (दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत तसेच दिनांक १.१.२०१६ ते दिनांक ३१.१२.२०१८ पर्यंतच्या कालावधीत), ज्या कर्मचारी /अधिकारी यांनी यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेतला आहे, त्यांना तसेच दिनांक ०१.०१.२०१९ नंतर शासन सेवेत सरळसेवा भरतीने नियुक्त होणा-या कर्मचा-यांना १०/२०/३० वर्षानंतर पात्रेनुसार अनुज्ञेय ठरणारी तीन लाभाची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना मंजूर करण्याकरिता संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीला अनुसरुन गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांची दिनांक ३१.०३.२०१९ पर्यंतची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये दि. १३/०८/२०१९ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करावी.

सदरची माहिती Excel Sheet DV-TT Natraj या फॉन्टमध्ये A 3 साईज पेपरवर तयार करावी, तसेच ई-मेल द्वारे roaurangabad@dtemaharashtra.gov.in या पत्यावर सॉफटकॉपी सुध्दा पाठवावी. सदर माहिती अचूक असल्याबाबत संस्था प्रमुखांनी प्रत्यक्ष खात्री करुन माहिती बरोबर असल्याचे प्रमाणित करुन सादर करावी.

**सहपत्र : विहित प्रपत्र**

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत : १. प्राचार्य, शासकीय अभियांत्रीकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

२. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने, औरंगाबाद/जालना/अंबड/नांदेड/जिंतूर/हिंगोली/बीड/उस्मानाबाद / पु.ला.शा.तं.नि.लातूर/शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, बार्शी रोड, लातूर यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

३ या कार्यालयाच्या गोपनीय विभाग यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

Circular 102030/Kakde 29719

प्रपत्र-अ

संस्थेचे नाव :

# दि.०१/०१/२०१६ नंतर दि.३१/०३/२०१९ पर्यंतच्या कालावधीत सेवेची १०/२०/३० वर्ष पूर्ण होत आहेत. अशा गट क व गट ड मधील पात्र कर्मचा-यांची माहिती.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव,पदनाम, कार्यरत कार्यालय/ संस्थेचे नाव | जन्म दिनांक | प्रथम नियुक्तीचा दिनांक/ पदनाम | सेवा नियमित केल्याचा दिनांक | प्रवर्ग | मागास वर्गीय असल्यास जात वैधता प्रमाणपत्र आहे किंवा कसे प्रत जोडण्यात यावी) | १२ वर्षानंतर पहिला लाभ मिळाल्याचा दिनांक व वेतनश्रेणी-ग्रेडवेतन(सहाव्या वेतन आयोगानुसार या कार्यालयांच्या आदेशाची प्रत जोडावी.) | सातव्या वेतन आयोगानुसार १० वर्षानंतर पहिल्या लाभाचा दिनांक व वेतनस्तर | २४ वर्षानंतर दुसरा लाभ मिळाल्याचा दिनांक व वेतनश्रेणी-ग्रेडवेतन (सहाव्या वेतन आयोगानुसार या कार्यालयांच्या आदेशाची प्रत) | सातव्या वेतन आयोगानुसार २० वर्षानंतर(१२+८) दुस-या लाभाचा दिनांक (सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी) आणि सातव्या वेतन आयोगाचा वेतनस्तर) | खाते परिक्षा उत्तीर्ण आहे काय? असल्यास तपशिल परीक्षा/वर्ष/संधी ( लागू असेल तेथे) | एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी परिक्षा उत्तीर्ण आहे काय? असल्यास पत्र क्र.व दिनांक | मराठी/हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण सुट आदेश क्रमांक व दिनांक (लागू असेल तेथे) | संगणक अर्हता-परिक्षेचा तपशिल परिक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | चारित्र्य पडताळणी झाली किंवा कसे | विभागीय चौकशी किंवा शिस्तभंग कार्यवाही चालू आहे किंवा कसे? चौकशी पूर्ण झाली असल्यास अथवा काही शिक्षा झली असल्यास त्याचा तपशिल नमुद करावा. | विनावेतन रजा असल्यास त्याचा तपशिल | दि.३१/०३/२०१९ अखेर मत्ता व दायित्वे विवरणपत्र सादर केली आहेत किंवा कसे? असल्यास सादर केल्याचा संस्थेचा जावक क्रमांक व दिनांक | संस्थाप्रमुख/ कार्यालय प्रमुख यांचा अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १३ | १४ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |

**टिप : १ सदर प्रपत्रातील माहिती A-3 पेपरवर मुळ सेवापुस्तक/सेवपाटावरुन तपासणी करुन अचूकपणे सादर करावी.**

**२ वर्ग-३ व वर्ग-४ साठी स्वतंत्र प्रपत्रात माहिती सादर करावी.**

**संस्था प्रमुखाची स्वाक्षरी/-**

Circular / Kakde/150719